# प्रकरण दुसरे

## कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांची संघटन पध्दती व स्थल निश्चिती

२.१ रसवंतीगृहांच्या कामकाजाचे स्वरूप

२.२ रसवंतीगृह व्यवसायाचा उगम आणि सद्य:स्थिती

२.३ कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांची संघटनपध्दती

२.४ कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांच्या संयोजकाबद्दल सर्वसाधारण माहिती

२.५ रसवंतीगृहासाठी आवश्यक भांडवल आणि भांडवल पुरवठा

२.६ कोल्हापूरातील रसवंतीगृहांची स्थलनिश्चिती

२.७ स्थलनिश्चितीबाबतीचा निर्णय

## प्रकरण दुसरे

## कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांची संघटनपध्दती व स्थलनिश्चिती

### २.१ रसवंतीगृहांच्या कामकाजाचे स्वरूप :

एकाद्या लहानशा जागेत हा व्यवसाय सुरू केला जातो आणि ' रस ' ची ग्राहकाची मागणी पूर्ण केली जाते. रसवंतीगृहाचे संयोजक-मालक ऊस उत्पादक शेतक-यांकडून आवश्यकतेनुसार कमी-अधिक प्रमाणात ऊस मिळवितात किंवा काही संयोजक-मालक स्वत:च्या मालकीच्या ऊस-शेतीतून ऊस गरजेनुसार आणतात. रसवंतीगृहात ग्राहक आल्यानंतर ग्राहकाच्या मागणीनुसार रसवंती यंत्राचे सहाय्याने ' रस ' काढून पुरविला जातो.

या व्यवसायात उत्पादन कार्य आणि सेवा पुरविण्याचे कार्य या दोन्ही कार्यांचे मिश्रण झालेले आढळते. रसवंतीगृहांच्या कामाचे दोन विभागात विभागणी करता येते.

अ) ऊसावर प्रक्रिया करून ' रस ' काढणे.

ब) उत्पादित केलेला रस ग्राहकांना पुरविणे.

अ) रसवंतीगृहांचा प्रमुख कच्चामाल म्हणजे ऊस. रसवंतीगृहांनी खरेदी केलेला ऊस अगर स्वत:च्या शेतातून आणलेला ऊस पालापाचोळा आणि माती चिटकलेला या स्वरूपात असतो. रसाची प्रत उच्च प्रतीची ठेवण्यासाठी असा ऊस अयोग्य ठरतो. म्हणून खरेदीलेला अगर आणलेला ऊस प्रथमत: स्वच्छ करून घेतला जातो. त्यासाठी कोयात्याचा वापर करून ऊसावर चिटकलेले पदार्थ काढून टाकले जातात. या प्रक्रियेस रसवंतीगृहाच्या व्यवसायात ' उस साळणे ' असे संबोधिले जाते. ऊस स्वच्छ केल्यानंतर ३ ते ४ फूट लांबीचे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

म्हणजेच साधारणत: एका ऊसाचे दोन तुकडे केले जातात. असा स्वच्छ केलेला ऊस आणि त्यासोबत विशिष्ट प्रमाणात बर्फ, आले व लिंबू असे एकत्रित-रित्या रसवंती यंत्रात घालून त्यातून ' रस ' तयार केला जातो. रसवंती यंत्राचे आकारमान लहान असल्याने आणि त्या यंत्राची रस काढून घेण्याची क्षमताही कमी असल्याने रसवंती यंत्रात प्रथमत: घातलेल्या ऊसाचे चिपाड टाकून न देता तेच चिपाड परत दोन ते तीन वेळा रसवंती यंत्रात घालून तेवढयाच ऊसापासून अधिक रस मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. अशी रसवंती यंत्रे प्रामुख्याने विद्युत मोटारीवर चालविलेली आढळतात. परंतु ज्यावेळी विद्युत पुरवठा खंडीत होतो त्यावेळी रसवंती यंत्रास हँडेल बसवून मानवी श्रमशक्तीद्वारे रसवंती यंत्रे फिरवून ' रस ' उत्पादित केला जातो. महाराष्ट्रातील काही विभागात वेगळया पध्दतीचे रसवंती यंत्र वापरून ते बैलाच्या सहाय्याने फिरवून रस उत्पादित केला जात असल्याचे आढळते.

या प्रकारे ऊस स्वच्छ करणे आणि ऊसापासून रस काढणे हे रसवंती गृहांचे कार्य ऊसावर प्रक्रिया करण्याचे असते. आणि या प्रक्रियेद्वारे जो ' रस ' उत्पादित केला जातो तो प्रत्यक्षरित्या ' शितपेय ' म्हणून वापरला जात असतो. पहिल्या विभागातील हे रसवंतीगृहांचे कार्य उत्पादन-कार्य या स्वरूपाचे असते.

ब) ऊसावर प्रक्रिया करून ' रस ' उत्पादित केल्यानंतर जे कार्य रसवंतीगृहात सुरू असते त्याचे स्वरूप सेवा-कार्य असेच असते. या दुसऱ्या विभागात उत्पादित केलेला ' रस ' ग्राहकांच्या मागणी नुसार म्हणजेच अर्धा ग्लास अगर पूर्ण ग्लास तसेच बर्फाचा छोटासा तुकडा टाकून अगर बर्फविरहित अशा स्वरूपात ग्राहकांना पुरविला जातो. रस गाळणे, ग्लास भरणे, रिकामे ग्लास धुवून घेणे, रसवंतीगृह आणि रसवंतीगृहातील टेबले यांची सफाई करणे इत्यादी कामाचा समावेश करता येतो. त्याच बरोबर रसवंतीगृहाच्या आसपासच्या परिसरात

मागणीनुसार रस नेऊन देणे याचाही समावेश या दुसऱ्या विभागात करावा लागतो. दुसऱ्या विभागातील रसवंतीगृहांचे हे काम एखाद्या उपहारगृहातील अगर शितपेयगृहातील कामासारखेच असते. या कार्याद्वारे रसवंतीगृहे उपभोक्त्या ग्राहकांना सेवांचा पुरवठा करताना आढळतात. म्हणून त्यांचे हे काम सेवा व्यवसाय स्वरूपाचे ठरते.

थोडक्यात, रसवंतीगृहांचे कामकाज हे केवळ उत्पादन करण्याचे नसते तसेच ते केवळ सेवा पुरविण्याचेही नसते, तर ` रस ` उत्पादित करून उपभोक्त्या ग्राहकांना प्रत्यक्षरित्या पुरविण्याचे असते. त्यामुळे हा व्यवसाय उत्पादन व्यवसाय व सेवा व्यवसाय अशा संमिश्र स्वरूपाचा असतो.

२.२ रसवंतीगृह व्यवसायाचा उगम व सद्य:स्थिती :

कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांचे सर्वेक्षण केले असता संशोधकास असे आढळून आले की, कोल्हापूर शहरात १९८९-९० सालात २२ स रसवंतीगृहे व्यवसाय करीत होती. त्यापैकी १४ रसवंतीगृहांचे संयोजक-मालक पुणे जिल्हातील पुरंधर तालुक्यातील भोपगाव, चांबळी, गराडे आणि कोडीत या गावचे मूळचे रहिवाशी असून त्यांच्या रसवंतीगृहे चालविण्याचा पूर्वानुभव होता. त्यांच्या कुटुंबात हा व्यवसाय वंशपरंपरेने चालला आहे. म्हणून संशोधकाने त्यांच्याशी या व्यवसायाच्या उगमासंबंधी माहिती मिळविण्याच्या संदर्भात चर्चा केली असता जी माहिती मिळाली ती अशी -

त्यांच्या मतानुसार रसवंतीगृहाचा व्यवसाय पुरंधर तालुक्यातील लोकांनी सुरू केला. पुणे शहराच्या पूर्व-दक्षिण बाजूस पसरलेल्या या तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने या भागातील बहुतेक लोक उपजिवीकेसाठी नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईला आणि इतर भागात जातात. मुंबईला गेलेल्या लोकांनी नोकरी बरोबरच लहान-मोठे व्यवसाय सुरू केले. या

लोकांनी विशेषत: भाजी व फळे विक्रीच्या व्यवसायात आपला शिरकाव केला. पुरंधर तालुक्यातील काही भागातून पूर्वीपासूनच विहीर-बागायत होती. विहिरीच्या पाण्यावर भाजीपाला, फळे आणि काही प्रमाणात ऊस पिकविला जात असे. उत्पादित केलेला भाजीपाला आणि फळे मुंबईस विक्री-साठी पाठविली जात असत. त्याच बरोबर काही लोकांनी मुंबईस ऊस नेऊन त्याचे एक फूट ते दीड फूट लांबीचे तुकडे अगर गंड-या करून त्याची विक्री करण्याचा व्यवसाय सुरू केला.

ऊसाचे तुकडे अगर गंड-या विकणा-या लोकांच्या काही कालाने असे लक्षात आले की, ऊसाचे तुकडे करून विकण्यापेक्षा त्याचा रस काढून विकणे फायदेशीर ठरेल. त्यादृष्टीने त्यानी प्रयत्न करून खेडेगावात गु-हाळात ऊसापासून रस काढण्यासाठी वापरण्यात येणा-या व लाकडापासून बनविण्यात येणा-या चरकासारखा छोटेखानी चरक तयार करून घेऊन त्याची मांडणी चार चाके असलेल्या गाडयावर केली. असा रसाचा फिरता गाडा किंवा ' फिरती रसवंती ' घेऊन उत्पादक-विक्रेते मुंबईच्या रस्त्यावर फिरून ' रसा ' ची विक्री करू लागले. हा व्यवसाय फायदेशीर आहे आणि एकाद्या गर्दीच्या ठिकाणी चालविल्यास तो चांगल्या प्रकारे चालू शकेल हे लक्षात आल्यानंतर त्यानी हळूहळू फिरती रसवंती बंद करून एकाद्या विशिष्ट ठिकाणी त्यानी स्थापना करण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर त्यानी आणखी एक बदल केला तो असा की ऊसाचा रस काढण्यासाठी वापरण्यात येणा-या चरकाचे आकारमान वाढवून त्याच्या बांधणीत बदल करून घेऊन हा चरक बैलाच्या सहाय्याने फिरविता येईल अशी सोय तयार करून घेतली. त्यामुळे पूर्वीच्या गाडयावरील चरकापेक्षा अधिक प्रमाणात ' रस ' काढता येणे त्यांना शक्य झाले. तसेच मानवी श्रमाचा वापरही कमी करता येणे शक्य झाले. शिवाय अधिक प्रमाणात रस उत्पादित करून व्यवसायात वाढही घडवून आणता येणे शक्य झाले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

काळाच्या ओघात विकसित होत जाणाऱ्या यांत्रिक सुधारणा बरोबर लाकडी चरकाची जागा लोखंडी चरकाने घेतली. वाढत्या मुंबईत चरक फिरविण्यासाठी वापरण्यात येणारा बैल आणि त्याची देखभाल करणे गैरसोयीचे ठरू लागले. या अडचणीवर मात करण्याच्या दृष्टीने रसवंतीचे मालक आणि काही कल्पक मिस्त्री यानी मिळून जो प्रयत्न केला त्यातूनच आज वापरण्यात येणारे रसवंती यंत्र विकसीत करण्यात आले. असे रसवंती यंत्र सुरुवातीस मानवी श्रमशक्तीद्वारे फिरविले जात असे पण ते फार कष्टाचे ठरते हे लक्षात आल्यानंतर या रसवंती यंत्रास विद्युत मोटार बसवून ते विद्युत शक्तीवर चालू राहील अशी सुधारणा करण्यात आली. थोडक्यात आजच्या रसवंती-गृहांचा उगम मुंबई शहरात झाला आणि पुरंधर तालुक्यातील लोकांनी हा व्यवसाय सुरू केला असा त्यांचा दावा आहे.

रसवंतीगृहाचा व्यवसाय साधा संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेला आढळतो. विशेषत: मुंबई, उत्तर आणि दक्षिण व पश्चिम महाराष्ट्रात हा व्यवसाय अधिक प्रमाणात आढळतो. महाराष्ट्रातील प्रमुख एस.टी. बसस्थानके या व्यवसायाने व्यापलेली असून मोठया शहरातूनही हा व्यवसाय चाललेला आढळतो. महाराष्ट्रात काही ठिकाणी अद्यापी बैलाच्या सहाय्याने फिरविता येणारा चरक अगर रसवंती यंत्र वापरून हा व्यवसाय चाललेला आढळतो. जेथे विद्युत कनेक्शन मिळालेले नसते आणि व्यवसाय केवळ अडीच ते तीन महिने (केवळ उन्हाळयातच) चालतो अशा निमशहरी भागात असा व्यवसाय बैलाच्या सहाय्याने फिरविता येणारा चरक वापरून हा व्यवसाय केल्याचे आढळते. तसेच रसवंती यंत्रास हँडेल बसवून मानवी श्रमाचे सहाय्याने रसवंती यंत्राद्वारे ` रस ` उत्पादित करून विकणाऱ्या फिरत्या ` रसगाडया ` काही ठिकाणी तुरळक स्वरूपात आढळतात. उदा. सोलापूर शहरात अद्यापी अशी फिरती रसवंतीगृहे व्यवसाय करताना आढळून येतात.

२.३ कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांची
संघटनपध्दती :

विविध व्यवसायात वेगवेगळ्या संघटनपध्दती अस्तित्वात असून काळाच्या ओघात संघटनपध्दती विकसित झालेल्या आहेत. खाजगी क्षेत्रात सामान्यपणे खाजगी मालकीपध्दती, भागीदारीपध्दती, सहकारीपध्दती आणि संयुक्त-भांडवली प्रमंडळी यासारख्या संघटनपध्दती सध्या अस्तित्वात आहेत. संशोधकाने कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहाचे गणना पध्दतीने सर्वेक्षण करताना या व्यवसायातील संघटनपध्दतीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला तेव्हा असे आढळून आले की, कोल्हापूरातील सर्वच रसवंतीगृहात खाजगी मालकीच्या संघटीत पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला असून कोणतेही रसवंतीगृह सरकार अगर सरकारचे एखादे खाते, तसेच सहकारी संस्था यानी चालविलेले नाही. व्यवसायाचे लघुतम स्वरूप, व्यवसायासाठी आवश्यक असलेले अल्पप्रमाणातील भांडवल, आणि व्यवसायाचा अल्पसा व्याप यामुळे एकटया संयोजकास हा व्यवसाय सुरू करता येणे शक्य असते. त्यामुळेच या व्यवसायात सहकारी पध्दती, संयुक्त भांडवली प्रमंडळी यासारख्या मोठया प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्या संघटन पध्दतीची आवश्यकता भासत नाही. आणि म्हणून या व्यवसायात खाजगी मालकीची संघटन पध्दती प्रामुख्याने आढळते. एखादी व्यक्ती अगर त्याचे कुटुंब व्यवसायातील सर्व जबाबदाऱ्या स्विकारून हा व्यवसाय करताना आढळतात.

२.४ कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांच्या
संयोजकाबद्दल सर्वसाधारण माहिती :

कोल्हापूरातील रसवंतीगृहातील संयोजकाबाबतीत एक साम्य आढळते की, असे संयोजक सदरच्या व्यवसायाची केवळ जबाबदारी घेतात असे नसून त्या व्यवसायाचे ते स्वत: व्यवस्थापनही करतात शिवाय रसवंतीगृहातील इतर कामगारांच्या बरोबरीने रसवंती यंत्रातून रस काढणे, तो ग्राहकांना देणे

यासारखी कामे देखील करताना आढळतात. म्हणजेच रसवंतीगृहाचा संयोजक हा संयोजनाचे काम तर करतोच पण त्याच बरोबर व्यवस्थापनाचे आणि प्रसंगी कामगार म्हणूनही काम करताना आढळतो. रसवंतीगृहाचे संयोजक एकाचवेळी तीन भूमिका पार पाडताना दिसून येतात. पूर्वीच्या काळात कुटीर व घरगुती उद्योगात संयोजकांचे संयोजक-मालक असे स्वरूप आढळत असे अगदी त्याच प्रकारची स्थिती रसवंती गृहांच्या संयोजकाच्या बाबतीत दिसून येते.

कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांच्या संयोजक-मालकांच्या बाबतीत आणखीही एक गोष्ट प्रकर्षाने आढळून आली ती म्हणजे बहुसंख्य संयोजक-मालक कोल्हापूर शहराच्या आणि कोल्हापूर जिल्हाच्या बाहेरचे आहेत. म्हणजे बहुसंख्य संयोजक स्थलांतरीत असे आहेत. संयोजक-मालकांची त्यांच्या मूळच्या राहण्याच्या ठिकाणावरून तीन विभागात करता येईल : अ) कोल्हापूर शहर, ब) कोल्हापूर जिल्हा आणि क) कोल्हापूर शहर आणि जिल्हा वगळता इतर ठिकाण. या वर्गीकरणानुसार संयोजक-मालकांची जी स्थिती आढळते ती अशी -

तक्ता क्रमांक २.१

कोल्हापूरातील रसवंतीगृहांच्या संयोजक-मालकांचे त्यांच्या मूळच्या राहण्याच्या ठिकाणानुसार वर्गीकरण करणारा तक्ता

| विभाग | कोल्हापूरातील रसवंतीगृहाच्या संयोजकांची संख्या | |
|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी |
| अ) कोल्हापूर शहर | ६ | २७.२७ |
| ब) कोल्हापूर जिल्हा | २ | ९.०९ |
| क) कोल्हापूर शहर व जिल्हा वगळता इतर ठिकाण | १४ | ६३.६४ |
| एकूण : | २२ | १००.०० |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, कोल्हापूर शहर आणि कोल्हापूर जिल्हा या विभागातील संयोजकांची संख्या केवळ ८ म्हणजेच एकूण संयोजक संख्येच्या ३६.३६ टक्के इतकी आहे. तर कोल्हापूर शहर व जिल्हा वगळता इतर ठिकाणावरील मूळचे रहिवाशी असलेल्या संयोजकांची संख्या १४ म्हणजेच एकूण संयोजक संख्येच्या ६३.६४ टक्के इतकी आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांचे संयोजक-मालक मोठया प्रमाणात स्थलांतरीत असे आहेत.

एकूण संयोजकांपैकी २ संयोजक कोल्हापूर जिल्हातील राधानगरी तालुक्यातील असून १४ संयोजक पुणे जिल्हातील पुरंधर तालुक्यातील आहे. त्यामुळे स्थलांतरीत संयोजकांचे प्रमाण फारच मोठे असल्याचे आढळते. पुणे जिल्हातील पुरंधर तालुक्यातील या संयोजकांची मुळच्या रहिवाशी गावानुसार विभागणी अशी आढळली. बोपगाव ९, चांबळी १, गराडे २, आणि कोडीत २, आणि ही सर्व गावे एकाच पंचक्रोशीतील आहेत. याच विभागातील लोक संपूर्ण महाराष्ट्रात रसवंतीगृहांचा व्यवसाय करण्याच्यादृष्टीने विखुरलेले आढळतात.

कोल्हापूरातील सदरच्या २२ संयोजक-मालकांपैकी केवळ एक संयोजक स्त्री असून उरलेले २१ संयोजक पुरूष आहेत. स्थलांतरीत संयोजक-मालकांनी आपला हा व्यवसाय योग्यरित्या चालविला जावा या करिता पत्नी, मुले व कुटुंबातील अवलंबून असणारी आणि रसवंतीगृहास आवश्यक असणारी माणसे यासह कोल्हापूरात वास्तव्य केलेले आढळते. रसवंतीगृहांचा हंगाम संपल्यानंतर सुट्टीनिमित्य ते आपल्या मुळच्या गावी जाऊन शेतीवर कामे करतात.

कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांच्या संयोजक-मालकांच्या शिक्षणाबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आढळली.

तक्ता क्रमांक २.२

कोल्हापुरातील रसवंतीगृहांच्या संयोजक-मालकांची शैक्षणिक पात्रता दर्शविणारा तक्ता

| शिक्षण | संयोजक-मालकांची संख्या | |
|---|---|---|
| | संख्या | शेकडा प्रमाण |
| इयत्ता ७ वीपर्यन्त | १३ | ५९.०९ |
| इ. ८ वी ते इ. १२ वी | ३ | १३.६४ |
| उच्च शिक्षण | ४ | १८.१८ |
| अशिक्षित | २ | ९.०९ |
| एकूण : | २२ | १००.०० |

तक्त्यावरून स्पष्ट होते की, रसवंतीगृहाच्या व्यवसायात उच्च-शिक्षित संयोजकांचे प्रमाण फारच कमी असून त्या मानाने अल्पशिक्षित संयोजकांचे प्रमाण फारच मोठे आहे. हा तक्ता असेही दर्शवितो की, १३ संयोजक ७ वीपर्यन्त शिकलेले व २ अशिक्षित संयोजक हा व्यवसाय चालवित आहेत. आणि त्यांचा व्यवसाय इतर संयोजकांच्या स्पर्धेत टिकून आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, हा व्यवसाय सुरु करण्यासाठी आणि तो कार्यक्षमतेने चालविण्याकरिता माध्यमिक अथवा उच्च शिक्षणाची आवश्यकता नाही. केवळ व्यवसाय चालविण्याची जिद्द तळमळीने काम करण्याची व पडेल ते काम करण्याची वृत्ती आणि कष्ट करण्याची तयारी असल्यास कोणतीही अल्पशिक्षित व्यक्ती थोडयाशा व्यवहार ज्ञानाच्या व अल्पशा भांडवलाचे आधारे हा व्यवसाय सुरु करु शकते.

रसवंतीगृहे चालविण्याच्या पुर्वानुभवाबाबतची रसवंतीगृहांच्या संयोजकाची अशी स्थिती आढळते की, पुणे जिल्हातून स्थलांतरीत झालेल्या संयोजकांच्या बाबतीत त्यांना व्यवसायाचा पुर्वानुभवाचा वारसा मिळालेला आहे. त्यांच्या कुटुंबात फार वर्षांपासून हा व्यवसाय केला जात असल्याने अगदी लहानपणापासूनच त्याना सदरच्या व्यवसायाचे बाळकडू मिळालेले असते. त्यामुळे रसवंतीगृहातील इतर कामगारांप्रमाणे काम करण्यापासून ते रसवंती-गृहाचे व्यवस्थापन करण्यापर्यन्तच्या सर्व कामात ते तरबेज असलेले आढळतात. या उलट कोल्हापूर शहर आणि जिल्हातील संयोजकांना सांप्रत व्यवसायाचा पुर्वानुभव असल्याचे आढळत नाही. कोल्हापूर शहर व जिल्हातील संयोजकांनी कोल्हापूरातील पुणे विभागातून येऊन स्थायिक झालेल्या रसवंतीगृहाच्या कामकाजाचे निरीक्षण करून नंतरच हा व्यवसाय सुरू केला. त्यामुळे आणखी एक बाब आढळते की, कोल्हापूर शहर व जिल्हातील संयोजकांची रसवंतीगृहे १९८० चा हंगाम आणि नंतरच्या काळात स्थापन झाली असून त्या अगोदरच पुणे जिल्हातील संयोजकांनी हा व्यवसाय कोल्हापूरात सुरू केला होता. १९७२ चा रसवंती-हंगाम आणि त्यानंतरच्या काळात हा व्यवसाय पुणे जिल्हातील पुरंधर तालुक्यातील संयोजकांनी रसवंतीगृहांच्या व्यवसायाचा पाया घातला म्हणून कोल्हापूरातील रसवंती व्यवसायांच्या स्थापनेचे श्रेय स्थलांतरीत संयोजकांना देणे भाग पडते.

कोल्हापूर शहरातील रसवंती-व्यवसायातील सर्व संयोजक-मालकांच्या बाबतीत साम्य आढळणारी एक बाब म्हणजे पडेल ते काम करण्याची त्याची तयारी. केवळ देखरेख करणारा व्यवस्थापक म्हणून हे संयोजक काम करीत नाहीत तर प्रसंगी इतर कामगारांच्या जोडीने रिकामे ग्लास धुवून रस ग्राहकांना पुरविण्याचेही काम करताना आढळतात. ते श्रमाला प्रतिष्ठा देतात. आपण मालक आहोत, एखादे काम कसे करावे असा ते विचार करताना आढळत नाहीत. ग्राहकांची संख्या वाढते त्यावेळी कामगारांच्या सांथास खांदा लावून हे मालक

संयोजक काम करताना आढळतात. कष्ट करण्याची प्रवृत्ती, व्यवसाय करण्याची जिद्द, मनमिळाव् स्वभाव, आणि ग्राहकाशी सौजन्याची वागणूक हे त्यांच्या वर्तणुकीचे गुण विशेष म्हणून सांगता येतील, त्यांच्याकडून ग्राहकांना मिळणारी सौजन्याची वागणूक है या व्यवसायाचे अमूर्त असे भांडवल आहे. त्यांच्या वृत्तीमुळेच ग्राहकांची या व्यवसायाबाबत फारशी तक्रार असलेली आढळत नाही. तसेच बहुतेक रसवंतीगृह-संयोजक स्थलांतरीत असून त्यानी ज्या जागेत व्यवसाय सुरू केला होता त्या जागेच्या मालकांशीही त्यानी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केल्याचे आढळतात त्यामुळे रसवंतीगृहांची जागा बदलणे इतरत्र रसवंतीगृह स्थापन करणे असा प्रयत्न त्यांच्याकडून झालेला आढळत नाही.

कोल्हापूरातील रसवंती व्यवसायातील संयोजकानी आपापल्या रसवंतीगृहांचे नामकरण केले आहे ते ही समजावून घेणे हे संयोजकांच्या वर्तणुकीच्या-दृष्टीने आणि रसवंती व्यवसायाच्या दृष्टीने उद्बोधक ठरते. बहुतेक रसवंती-गृहाची नावे ` नाथ प्रसन्न ` ` श्री कानिफनाथ प्रसन्न `` नवनाथ प्रसन्न ` अशी आहेत. विशेषत: पुणे जिल्ह्यातून स्थलांतरीत झालेल्या संयोजकांच्या रसवंतीगृहाच्या नावात ` नाथ,` ` नवनाथ ` व ` कानिफनाथ ` हे शब्द आढळतातच.

या संदर्भात संशोधकाने संयोजकांशी चर्चा केली असता असे समजले की, बोपगाव, ता. पुरंधर, जिल्हा पुणे या गावच्या डोंगरावर नाथपंथीय श्री कानिफनाथांची समाधी असून तेथे एक मोठे देवालय आहे. त्या भागातील लोकांची कानिफनाथावर मोठी श्रध्दा असून आपल्या व्यवसायात त्या ईश्वरी शक्तीचा वरदहस्त असतो असे ते मानतात. थोडक्यात, पुणे विभागातील हे सर्व स्थलांतरीत संयोजक धार्मिक वृत्तीचे व श्रध्दाळू असलेले आढळतात. तथापि केवळ दैवावर विश्वास न ठेवता त्यानी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिलेली आढळते. काम करीत राहिल्यास त्यात दैव मदत करते असा त्यांचा विश्वास असल्याने

त्यानी आपल्या सचोटीने, चिकाटीने, मिमिळावू स्वभावाने आणि सौजन्याच्या वागणुकीने त्यानी ` नाथ,`` नवनाथ ` व ` कानिफनाथ ` या नावाद्वारे स्थापन केलेल्या रसवंती व्यवसायास एक प्रतिष्ठा आणि लौकिक प्राप्त करून दिला आहे. त्यामुळेच ग्राहकांच्या मनामध्ये देखील पुणेरी रसवंतीगृहाबद्दल आकर्षण असल्याचे दिसून येते. याचे एक उदाहरण असे देता येईल की, ` नाथ,` ` नवनाथ ` अगर ` कानिफनाथ ` या नावाचा या व्यवसायात लौकिक असल्याने त्या लौकिकाचा फायदा मिळविण्याच्यादृष्टीने कोल्हापूर शहरातील मुळचे रहिवाशी असलेल्या दोन संयोजकांनीही आपल्या रसवंतीगृहाच्या नामकरणात ` नवनाथ ` हा शब्दप्रयोग वापरलेला आढळतो.

२.५ रसवंतीगृहासाठी आवश्यक भांडवल
व भांडवल पुरवठा :

सर्वेक्षणातून अशी माहिती मिळाली की, रसवंतीगृहाचा व्यवसाय सुरू करण्यासाठी अल्पप्रमाणावरच भांडवल आवश्यक असते. शिवाय असेही लक्षात आले की, सुरुवातीच्या काळात जेवढया भांडवलावर हा व्यवसाय सुरू केला जाऊ शकत होता त्यापेक्षा आता थोडे अधिक भांडवल मूळची गुंतवणूक म्हणून आवश्यक आहे. कारण मध्यंतरीच्या काळात रसवंती-व्यवसायास आवश्यक असलेल्या साधनांच्या किंमतीत मोठी वाढ झालेली आहे. कोल्हापूरात जागा भाड्याने घेऊन (कोणत्याही स्वरूपात डिपॉझिट न देता) हा व्यवसाय १९७२ साली, ४००० रुपये ते ५००० रुपयांच्या मूळ गुंतवणुकीत सुरू करता येत होता. पण नंतरच्या काळात रसवंतीगृहांच्या साधनांच्या वाढलेल्या किंमतीमुळे हा व्यवसाय सुरू करण्यासाठी १९८० ते १९८५ या काळात ८००० रुपये ते १२००० रुपयांपर्यन्त मूळ गुंतवणूक करावी लागत होती पण १९८५ नंतरच्या काळात रसवंतीगृह सुरू करण्यासाठी १५००० ते १६००० रुपये गुंतविणे आवश्यक ठरले.

सर्वेक्षणातून असेही स्पष्ट झाले आहे की, पक्क्या इमारतीत रसवंतीगृहे सुरू केल्यास त्यांची मूळची गुंतवणूक तुलनेने कमी पण जागा-भाडे जास्त असते. या उलट रिकामी जागा भाड्याने घेऊन त्यावर शेड उभारून त्यात रसवंतीगृह सुरू करण्यासाठी करावी लागणारी मूळची गुंतवणूक तुलनेने अधिक असते. आणि जागेचे भाडे तुलनेने कमी असते. कोल्हापूरात कार्यरत असलेल्या एकूण २२ रसवंतीगृहांपैकी १६ रसवंतीगृहे पक्क्या इमारतीतून स्थापन झालेली असून ६ रसवंतीगृहे लोखंडी पत्र्याचे शेड उभारून त्यामध्ये व्यवसाय करीत असलेली आढळतात. अशा रसवंतीगृहांना शेड उभारण्याचा जादा खर्च करावा लागत असल्याने त्यांची मूळची गुंतवणूक अधिक प्रमाणात करावी लागल्याचे आढळून आले.

या मूळच्या गुंतवणूकी बरोबरच व्यवसाय अखंडीतपणे चालू ठेवण्यासाठी रसवंतीगृहांना खेळत्या भांडवलाची आवश्यकता असते. खेळते भांडवल कामगारांचे पगार देणे, ऊस खरेदी करणे, बर्फ, आले, लिंबू खरेदी करणे, वीज-बिल भरणे, कामगारांच्या जेवण व नाष्ट्याची व्यवस्था करणे यासाठी आवश्यक असते. रसवंतीगृहाच्या व्यवसायात ' रस ' विक्रीतून दररोज रोख उत्पन्न मिळत असल्याने खेळते भांडवल म्हणून फार मोठी रक्कम त्यांना आवश्यक नसते. सर्वेक्षणातून असे आढळून आले की, मूळ गुंतवणूक करून हा व्यवसाय सुरू केल्यानंतर केवळ ३००० ते ४००० रूपयांचे खेळते भांडवलावर हा व्यवसाय सुरळीतपणे चालू ठेवता येतो.

सदरच्या सर्वसाधारण स्थितीपेक्षा एक अपवादात्मक स्थिती सर्वेक्षणातून उघडकीस आली ती म्हणजे एस.टी. बस स्थानकावरील रसवंतीगृहाची. कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकावरील रसवंतीगृहाची मूळची गुंतवणूक, उत्पादन आणि विक्री, जागेचे भाडे या सर्व बाबी कोल्हापूरातील इतर रसवंतीगृहाशी तुलना करता फारच मोठया प्रमाणात आढळल्या. कोल्हापूरातील इतर रसवंती-

A
9679

गृहांच्या जागेच्या भाड्याच्या मानाने तेवढ्या आकारमानाच्या जागेचे मध्यवर्ती बस स्थानकावरील रसवंतीगृहाचे जागेचे भाडे १२ ते १५ पटीने अधिक असल्याचे आढळले. त्याबाबत अधिक चौकशी करता असे आढळून आले की, बस स्थानकावरील रसवंतीगृहाची जागा लिलाव पध्दतीने चालविण्यासाठी दिली जाते. अशा लिलावात अनेक स्पर्धक भाग घेतात. एस.टी. स्टॅन्डवरील रसवंतीगृहात विक्री मोठी होऊ शकत असल्याने आणि बसस्थानकावरील प्रवाशांची गर्दी जेवढी अधिक तेवढी रसाची विक्री मोठी होण्याची शक्यता अधिक असल्याने लिलावातील स्पर्धक बसस्थानकावरील जागेचे भाडे अधिक देण्यास तयार असतात. अशा जादा भाडे देण्याची तयारी असलेल्या स्पर्धकात स्पर्धा होऊन बस स्थानकावरील जागेचे भाडे मोठ्या प्रमाणात वाढल्याचे आढळते.

रसवंती-व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या साधनांचा आणि त्यांच्या १९९० मधील किंमतीचा विचार करता संशोधकास असे आढळले की, १९९० च्या रसवंती हंगामात नवीन व्यवसाय सुरू करणाऱ्या संयोजकास २५००० रुपये ते २६००० रुपयांचे भांडवल पुरेसे ठरू शकेल. त्याचे विवरण पुढीलप्रमाणे :

## तक्ता क्र. २.३

१९९० मध्ये नवीन रसवंतीगृह सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवलाचा तक्ता

| वर्णन | आवश्यक भांडवल (रुपयांत) |
| --- | --- |
| १) मूळ गुंतवणूक | |
| अ) रसवंती यंत्र, मोटर आणि सोंके | १५,००० |
| ब) चार टेबल्स व चार बाकडी | ५,००० |
| क) वीज मंडळाकडे ठेवावी लागणारी ठेव आणि इलेक्ट्रिक फिटींग | ९०० |
| ड) पाणी साठविण्यासाठी बॅरील | २५० |
| इ) जागेचे मासिक भाडे | ४०० |
| ई) काचेचे २ डझन ग्लास | ५० |
| प) कोयता व सुरी | ५० |
| फ) जाळी २ | २० |
| ब) तीन बादल्या | १३० |
| म) म्युनिसिपल व गुमास्ता चार्जेस | १४५ |
| एकूण मूळ गुंतवणूक | २१,९४५ |
| २) खेळते भांडवल | ४,००० |
| एकूण भांडवल | २५,९४५ |

वरील भांडवल गुंतवणूकीचा विचार करताना संशोधकाने १९९० मधील किंमतीचा विचार केला आहे तसेच रसवंतीगृहासाठी जागा मिळविताना संयोजकास आगाऊ रक्कम जागा मालकास द्यावी लागत नाही असे मानले आहे. तक्ता क्रमांक २.३ वरून असे स्पष्ट होते की, रू. २५,००० ते रू. २६,००० स्वढ्या भांडवलात स्काधा संयोजक नवीन रसवंतीगृह सुरू करू शकतो.

कोल्हापूरात कार्यरत असलेल्या रसवंतीगृहाच्या भांडवल पुरवठ्याबाबतची तपासणी करता आढळून आले की, २२ रसवंतीगृहाच्या संयोजकांपैकी २१ संयोजकांनी स्वत:च्या भांडवलावर आपला व्यवसाय सुरू केला असून व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांनी इतर कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांची त्यांनी मदत घेतलेली नाही. केवळ स्काच संयोजकाने मूळ गुंतवणूकीसाठी आपल्या मित्रांची मदत घेतल्याचे आढळते, आणि तीही मदत कर्जाऊ रक्कम या स्वरूपात भांडवल न घेता केवळ उसनवार रक्कम म्हणून भांडवल घेतले होते असे आढळले. थोडक्यात, कोल्हापूरातील रसवंती-व्यवसाय बँका व पतसंस्था यांच्या मदतीविना केवळ रसवंतीगृहांच्या संयोजकांच्या भांडवलावर हा व्यवसाय सुरू झाला असून सुरळीतपणे चालू आहे.

## २.६ कोल्हापूरातील रसवंतीगृहांची स्थलनिश्चिती :

कोल्हापूरातील रसवंतीगृहांची स्थलनिश्चिती समजावून घेण्यासाठी कोल्हापूरातील गजबजलेल्या ठिकाणांची माहिती करून घेणे आवश्यक ठरते. कोल्हापूर शहर हे दक्षिण महाराष्ट्रात व्यापार व उद्योगाचे प्रमुख केंद्र म्हणून मान्यता पावले आहे. व्यापार व उद्योगाच्या वाढीबरोबरच येथील लोकसंख्याही वाढत गेली आहे. कोल्हापूर शहराच्या मध्यमागी विविध प्रकारांचा व्यापार स्कवटलेला आढळतो. शिवाजी चौक, महाद्वार रोड, ताराबाई रोड, बिंदू चौक, लक्ष्मी रोड, राजाराम महाराज चौक या भागात लोकांची गर्दी असलेली कायमपणे दिसून येते. त्यामुळे अशा लोकांची गर्दी असलेल्या भागातच रसवंतीगृहे स्थापन झालेली आढळतात.

कोल्हापूरात स्थापित झालेल्या रसवंतीगृहांची संख्या वेगवेगळ्या विभागानुसार पुढील प्रमाणे आढळते.

| | | |
|---|---|---|
| ताराराणी रोड | ... | ३ |
| महाद्वार रोड (खरीकॉर्नरसह) | ... | ३ |
| लक्ष्मीपुरी (आयोध्या टॉकीज समोर) | ... | १ |
| व्हीनस कॉर्नर | ... | १ |
| मध्यवर्ती बसस्थानक | ... | १ |
| कसबा रोड | ... | २ |
| सुभाष रोड | ... | ३ |
| राजारामपुरी (शाहुनगरसह) | ... | ३ |
| खासबाग मैदान नजीक | ... | १ |
| बिंदू चौक | ... | १ |
| जुना राजवाडा (महालक्ष्मी दक्षिण दरवाजा) | ... | १ |
| टॉऊन हॉलसमोर | ... | १ |
| बागल चौक | ... | १ |
| | एकूण: | २२ |

कोल्हापूरातील रसवंतीगृहांच्या स्थलनिश्चितीच्या दृष्टीने असे आढळते की, वेगवेगळ्या सिनेमागृहांच्या सानिध्यात एकूण ६ रसवंतीगृहे स्थापन झालेली आहेत. आणि नाट्यगृहाच्या सानिध्यात १ रसवंतीगृह स्थापन झाल्याचे आढळते. ताराराणी विद्यापीठासमोर १ आणि गोपाळकृष्ण गोखले कॉलेज समोर एक याप्रकारे महाविद्यालयांच्या सानिध्यात २ रसवंतीगृहे स्थापन झाल्याचे आढळले. मध्यवर्ती बस स्थानकात १ आणि संभाजीनगर बस स्थानकानजीक १

अशी बस स्थानकांच्या सानिध्यात २ रसवंतीगृहे कार्यरत होती. महाराष्ट्रभर प्रसिध्द असलेले महालक्ष्मी मंदिर कायमच गजबजलेले असते. महालक्ष्मी मंदिराच्या पश्चिम दरवाजा विभागात १ तर दक्षिण दरवाजास लागून १ अशी दोन रसवंतीगृहे मंदिरासमीप असलेली आढळतात. महालक्ष्मी मंदिर, महाद्वार रोड आणि रंकाळा तलाव ही कोल्हापूर शहरातील लोकांची फिरण्याची मुख्य ठिकाणे म्हणून ओळखली जातात त्यामुळे महाद्वार रोड आणि तेथून रंकाळा तलावाकडे जाणारा ताराबाई रोड या विभागात एकूण ६ रसवंतीगृहे स्थापन झालेली आढळतात.

ज्या विभागात माणसांची ये-जा जास्त असते त्या विभागात रसवंतीगृहांनी आपली जागा निवडलेली आढळते. म्हणून कोल्हापूर शहरातील रसवंतीगृहांच्या स्थान निश्चितीचा विचार करता गर्दीचे ठिकाण अगर विभाग रसवंतीगृहांच्या स्थाननिश्चितीसाठी निवडला जातो. या गृहितकाच्या विधानास अधिक बळकटी येते.

२.७ <u>स्थलनिश्चिती बाबतचा निर्णय</u> :

कोल्हापूरातील रसवंतीगृहांच्या संयोजकाशी चर्चा करताना त्यांच्या संप्रत व्यवसायाच्या स्थलनिश्चिती बाबतच्या निर्णयाच्या संदर्भात पुढील प्रमाणे माहिती मिळाली. सात संयोजकांनी सिनेमागृहे आणि नाटयगृहांच्या सानिध्याचा विचार करून आपल्या रसवंतीगृहाची जागा निवडलेली आहे. धार्मिक क्षेत्र आणि प्रेक्षणीय स्थळ याच्या सानिध्यास प्राधान्य देऊन सहा संयोजकांनी आपला व्यवसाय सुरु केला होता. शाळा व महाविद्यालयांच्या सानिध्याचा विचार करून दोन रसवंतीगृहे स्थापन झालेली आढळली. एस.टी. स्टॅन्ड आणि बस स्टॉप याचा विचार करून तीन संयोजकांनी हा व्यवसाय सुरु केल्याचे आढळले. शासकीय, निमशासकीय, सहकारी स्वरूपाच्या

कार्यालयांच्या सानिध्याचा विचार तीन संयोजकांनी केलेला आढळतो. विविध वस्तूंच्या बाजारपेठेच्या सानिध्याचा विचार करून पाच संयोजकांनी रसवंतीगृहाची स्थापना केली आहे. सर्वच संयोजकांनी रहदारी आणि लोकांची गर्दी असलेल्या ठिकाणाचा विचार करून आपल्या व्यवसायाची जागा निवडल्याचे आढळते.

सिनेमागृह, बाजारपेठ, धार्मिक क्षेत्र, कार्यालये, शाळा व महाविद्यालये यापैकी कोणत्याही सानिध्यामुळे रहदारी आणि लोकांची गर्दी ज्या विभागात होत असते तो विभाग रसवंतीगृहाच्या स्थापनेच्या दृष्टीने निवडला जातो. थोडक्यात बाजारपेठेचे सानिध्य हा रसवंतीगृहाच्या स्थल-निश्चितीवर प्रभाव पाडणारा निर्णायक घटक ठरतो.

२.८ कोल्हापूर शहरात रसवंतीगृहे स्थापन करण्याच्या दृष्टीने संभाव्य स्थलनिश्चिती ठिकाणे :

कोल्हापूर शहरातील संपूर्ण परिसराची पहाणी केल्यानंतर आणि कोल्हापूरातील रसवंतीगृह-संयोजकांशी चर्चा केल्यानंतर कोल्हापूरात अनेक ठिकाणी रसवंतीगृहे योग्यरित्या चालू शकतील असा संशोधकास विश्वास वाटतो. कोल्हापूरातील रसवंतीगृह-व्यवसायाचा विचार करता त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने संभाव्य ठिकाणे रसवंतीगृहांच्या स्थलनिश्चितीच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतील ती अशी -

तक्ता क्र. २.४

कोल्हापूरातील रसवंतीगृहास स्थळनिश्चितीचे संदर्भात उपयुक्त ठिकाणे

| अनु. | परिसराचे नाव (संभाव्य) | रसवंतीगृहांची अपेक्षित संख्या |
|---|---|---|
| १. | शिवाजी चौक आणि कोल्हापूर महानगरपालिका परिसर | २ |
| २. | भवानी मंडप | १ |
| ३. | शिवाजी उद्यमनगरातील पार्वती टॉकीज समोरील भाग | १ |
| ४. | पापाची तिकटी | १ |
| ५. | मिरजकर तिकटी | १ |
| ६. | ताराराणी चौक | १ |
| ७. | आर.टी.ओ. कार्यालय परिसर | १ |
| ८. | बी.टी. कॉलेज परिसर | १ |
| ९. | टेंबोली नाका रेल्वे फाटक | १ |
| १०. | शिवाजी विद्यापीठ | १ |